# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

**मराठी व भूगोल विभाग**



सकाळ

पुणे, शुक्रवार
२६ जानेवारी २०१८

४

# राजगुरुनगरच्या विद्यार्थ्यांची पुस्तकांच्या गावाला भेट

भिलार (ता. महाबळेश्वर, जि. सातारा) : महाबळेश्वरजवळील भिलार या पुस्तकांच्या गावाला भेट देऊन वाचनाचा आनंद घेताना हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे विद्यार्थी.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख

दि. २१ जानेवारी २०१८

# 'भिलार'मधील साहित्य-संस्कृतीची भेट अविस्मरणीय

## डॉ. संजय शिंदे : राजगुरु महाविद्यालयातील ९० विद्यार्थ्यांची पुस्तकाच्या गावची सहल

राजगुरुनगर, दि. २० (प्रतिनिधी) - निसर्गाचे सानिध्य, २५ हजार पुस्तकांची मेजवानी आणि गावकऱ्यांनी केलेला आपुलकीच्या आदरातिथ्याचा गोडवा हा अनुभव अविस्मरणीय आहे. पुस्तक आपुल्याला खूप देतात, अनुभव, विचार, ज्ञान बळकट करतात. वाचनाच्या जाणीवेतून मुलांची सृजनशीलता वाढविण्यासाठी अशा प्रकारच्या वाचनसहलींचे मोठ्या प्रमाणात आयोजन करून अशा अभिनव उपक्रमाला भेट द्यावी. पुस्तकांच्या गावातील ही साहित्य व संस्कृती सोबत घेऊन जावी, अशी अपेक्षा हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी सांगितले.

मराठी भाषा पंधरवड्याचे औचित्य साधून राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील भूगोल व मराठी विभागातील ९० विद्यार्थ्यांनी महाबळेश्वरजवळील देशातील पहिल्या पुस्तकांच्या गावाला 'भिलार' भेट दिली. त्यावेळी ते बोलत होते. या वाचनप्रेरणा शैक्षणिक सहलीचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, भूगोल विभाग प्रमुख प्रा. दिलीप मुळूक, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. गणेश मोढवे, विद्यापीठ प्रतिनिधी हरिप्रसाद खळदकर यांनी केले.

यावेळी पुस्तकांचे गाव भिलार याबाबत आयोजित विविध विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली. या प्रकल्पाचे सहायक बाळासो हावळे यांनी विद्यार्थ्यांना संपूर्ण प्रकल्पाची माहिती दिली. शासनाचा पुढाकार आणि ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे भिलारमध्ये पुस्तकांच्या गावाच्या या उपक्रमाची निर्मिती झाली असून विद्यार्थ्यांनी त्यापासून प्रेरणा घेऊन आपापल्या गावात असा उपक्रम सुरू करावा, असे त्यांनी आवाहन केले.

निसर्गाच्या सानिध्यात असलेल्या पुस्तकांच्या गावातील दालन



भिलार : हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मराठी भाषा पंधरवड्याचे औचित्य साधून पुस्तकांच्या गावाला भेट दिलेली भेट.

पुस्तकांच्या सहवासाचा अनुभव अविस्मरणीय आहे. वाचकांनी अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या गावाला भेट द्यायला हवी, अशी अपेक्षा तृप्ती शिरोळे, सचिन वैद, सुनील गायकवाड, सचिन शिंदे, शशिकांत पावक, सोपान मसे, सीमा आवटे, क्षितिज लाडे या विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. यावेळी आधुनिक मराठी कवितेचे जनक केशवसुतांचे जन्मगाव असलेल्या मालगुंड या गावालाही भेट देऊन त्यांच्या कवितांचा परिचय करून घेतला.

### २५ हजार पुस्तकांचा खजिना

भिलार या गावामध्ये कथा, कादंबरी, कविता, ललित, बालसाहित्य, संतसाहित्य, चरित्र, आत्मचरित्र, विज्ञान, इतिहास, प्रवासवर्णन अशा विविध साहित्य प्रकारातील सुमारे पंचवीस हजारांपेक्षा अधिकची पुस्तके या ठिकाणी उपलब्ध आहेत. साहित्यप्रकाराची सुसंगत अनुभवचित्रे व कलाकृतींनी घरांच्या भिंती सजल्या आहेत. जागोजागी नामवंत साहित्यिकांच्या गाजलेल्या कवितांचे व साहित्यविषयक माहितीचे फलक, भिंतीवर विविध पुस्तकांच्या मुखपृष्ठांची रंगसंगती करून संपूर्ण गावाची आकर्षक सजावट करण्यात आली आहे. गावातील नामवंत साहित्यिकांचा परिचय नेमक्या शब्दात करून देणाऱ्या फलकांनी वाचनाचा हा मंदिर सजले आहे.

दै. लोकमत दि. २१/१/२०१८

# विद्यार्थ्यांनी घेतला पुस्तकांच्या गावात 'वाचनानंद'

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील भूगोल व मराठी विभागातील सुमारे ९० विद्यार्थ्यांनी मराठी भाषा पंधरवड्याचे औचित्य साधून महाबळेश्वरजवळील भिलार या देशातील पहिल्या पुस्तकांच्या गावाला भेट देऊन वाचनानंद अनुभवला आणि एखादे गाव इतके पुस्तकप्रेमाने भारलेले असू शकते, याचा प्रत्यक्षानुभवही घेतला.

कथा, कादंबरी, कविता, ललित, बालसाहित्य, संतसाहित्य, चरित्र, आत्मचरित्र, विज्ञान, इतिहास, प्रवासवर्णन अशा विविध साहित्यप्रकारांतील सुमारे २५ हजारांपेक्षा अधिकची पुस्तके या ठिकाणी उपलब्ध आहेत. ग्रामस्थांनी आपल्या राहत्या घरचा काही भाग वाचन संस्कृती समृद्ध करण्याच्या या उपक्रमासाठी दिला आहे.



हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील ९० विद्यार्थ्यांनी मराठी भाषा पंधरवड्याचे औचित्य साधून महाबळेश्वरजवळील भिलार या देशातील पहिल्या पुस्तकांच्या गावाला भेट देऊन वाचनानंद अनुभवला.

निसर्गाचे सानिध्य, २५ हजार पुस्तकांची मेजवानी आणि गावकऱ्यांनी केलेला आपुलकीच्या आदरातिथ्याचा गोडवा अनुभवणे अविस्मरणीय असल्याचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे व प्रा. दिलीप मुळूक यांनी सांगितले.

या वाचनप्रेरणा शैक्षणिक सहलीचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे, भूगोल विभागप्रमुख प्रा. दिलीप मुळूक, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. गणेश मोढवे, विद्यापीठ प्रतिनिधी हरिप्रसाद खळदकर यांनी केले.

- या वाचनप्रेरणा अभ्यास सहलीत विद्यार्थ्यांनी गावातील अनेक घरांना भेटी देऊन या उपक्रमाची माहिती जाणून घेतली.
- या वेळी पुस्तकांचे गाव भिलार याबाबत आयोजित चित्रफित विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली.
- या प्रकल्पाचे सहायक बाळासो हावळे यांनी विद्यार्थ्यांना संपूर्ण प्रकल्पाची माहिती दिली. शासनाचा पुढाकार आणि ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे भिलारमध्ये पुस्तकांच्या गावाच्या या अभिनव उपक्रमाची निर्मिती झाली.
- विद्यार्थ्यांनी त्यापासून प्रेरणा घेऊन आपापल्या गावात असा उपक्रम सुरू करावा, असे त्यांनी आवाहन केले.

पुणे, २१ जानेवारी २०१८

## विद्यार्थ्यांनी घेतला पुस्तकांच्या गावात 'वाचनानंद'

**राजगुरुनगर,** (वार्ताहर) : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील भूगोल व मराठी विभागातील सुमारे ९० विद्यार्थ्यांनी मराठी भाषा पंधरवड्याचे औचित्य साधून महाबळेश्वर जवळील भिलार या देशातील पहिल्या पुस्तकांच्या गावाला भेट देऊन वाचनानंद अनुभवला आणि एखादे गाव इतके पुस्तक प्रेमाने भारलेले असू शकते याचा प्रत्यक्षानुभवही घेतला.

भिलार येथे सरकारच्या पुढाकाराने वाचन चळवळ वाढावी, वाचनाची आवड सहज पूर्ण व्हावी, मराठीतील समृद्ध साहित्य परंपरेची माहिती व्हावी या उद्देशाने हा वाचन प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. विविध साहित्य प्रकारातील सुमारे पंचवीस हजारांपेक्षा अधिकची पुस्तके या ठिकाणी उपलब्ध आहेत.